# करारनामा

## विद्युत विभाग, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**विद्युत विभाग:- पीएमपीएमएल/विद्युत विभाग/५२८** दि.०१/०५/२०२३
**वर्कऑर्डर क्र.५२८ दि. ०१/०५/२०२३.**

**कामाचे नांव:-** परिवहन महामंडळाचे विविध डेपो, कॉलनी, इमारती, मुख्य कार्यालय इमारत इ. ठिकाणचे एसी देखभाल दुरूस्तीची कामे करणेबाबत.

**ठेकेदाराचे नांव :-** मे. निर्मिती एंटरप्रायझेस, पुणे

**पत्ता:-** शॉप क्र.१,नारायण बाग कॉम्पप्लेक्स,
माती गणपती जवळ, नारायण पेठ, पुणे-३०

**कामाची मुदत :-** दि. ०१/०५/२०२३ ते दि. ०८/०५/२०२४

**निविदा रक्कम रू:-** ५,००,०००/- (२५.५०% कमी)

**अनामत रक्कम रू:-** २५,०००/-

**करारनामा फी :-** ५००/-

**मसूदा फी:-** २,५००/-

Scanned with CamScanner

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये सत्यमेव जयते Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2023 ◑ BZ 647169

अनु.क्र. २९७७ दि. ११/७/२०२३ मु.शु.रक्कम ५०० पाचशे

दस्ताचा प्रकार करारनामा

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव निर्मिती एंटरप्रायझेस

पत्ता १ नारायणबाग कॉम्प्लेक्स, माती गणपती जवळ नारायण पेठ, पुणे ३०

दुसऱ्या पक्षकाराचे नाव PMPML

हस्ते व्यक्तीचे नाव व पत्ता शुभम उपरेकर – मा. शिल्पा कांबळे ...

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

सौ. जयश्री मिलिंद बेलसरे
परवाना क्र. २२०१०११
४२५ ब, शनिवार पेठ पुणे- ३

07 JUL 2023

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

## करारनामा

आज दिनांक माहे ऑगस्ट सन २०२३ इसवी ते दिवशी करारनामा करुन देतो ऐसाजे.....

(करारनामा लिहून देणार)
मे. निर्मिती एंटरप्रायझेस, पुणे तर्फे प्रोप्रायटर
श्री.सचिन अजित नहार, वय वर्ष:-४०, धंदा:- व्यवसाय,
शॉप क्र.१,नारायण बाग कॉम्पप्लेक्स,
माती गणपती जवळ, नारायण पेठ, पुणे-३०

या नावाने भारतात ठेकेदारची व्यवसाय करणारी फर्म तीचे वतीने व त्यांचे वालीवारस, निष्पादक, अभिहस्तांकीती या पुढे ज्यांचा उल्लेख ठेकेदार (कॉन्ट्रॅक्टर) असा केलेला आहे

Scanned with CamScanner

आणि

**(करारनामा लिहून घेणार)**
**मा.श्री.नितीन नार्वेकर,**
**सहव्यवस्थापकीय संचालक,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**
**स्वारगेट, पुणे-४११०३७**

यापुढे ज्यांचा सहव्यवस्थापकीय संचालक असा उल्लेख केला आहे. यामध्ये कायद्यामध्ये विहित असलेल्या संदर्भात विश्लेषणाविरुध्द नसलेले असे त्यांचे वारस, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. म्हणून त्या त्या वेळी पदधारण करणारी व्यक्ती यांचा समावेश आहे. यापुढे त्यांचा उल्लेख पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. असा केलेला आहे.

कंपनी ॲक्ट अन्वये मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जाहिरात क्र.ELE-02 दि.३०/०३/२०२३ रोजी दै. महाराष्ट्र टाईम्स, पुणे या दैनिकात जाहिरात देउन (कामाचे नांव ) **परिवहन महामंडळाचे विविध डेपो, कॉलनी, इमारती, मुख्य कार्यालय इमारत इ. ठिकाणचे एसी देखभाल दुरूस्तीची कामे करणेबाबत.**

**विषयांकित कामाची मुदत दिनांक ०९/०५/२०२३ ते दिनांक ०८/०५/२०२४ इतकी आहे.**

नमुन्यातील निविदा मागविण्यात आली होती. उपरोक्त जाहिरातीस अनुसरुन मे. निर्मिती एंटरप्रायझेस, पुणे यांना याकामी निविदेतील शेड्युल बी मधील परिणाम, दर, तपशील, निविदेतील अटी व शर्ती इ. माहितीप्रमाणे आपली निविदा परिवहन महामंडळास सादर केली आहे. ठेकेदाराने भरलेली रक्कम रुपये ३,७२,५००/- ची निविदा यथास्थितीत पी.एम.पी.एम.एल./विद्युत विभाग/५२८ दि.०९/०५/२०२३ ने मा.सहव्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी मान्य करुन स्विकारली आहे. सदर मान्य निविदेतील अटी व शर्ती यांना अधिन राहून ठेकेदार जाहीर करीत आहे व स्वखुषीने लिहून देत आहे की,

१. उपरोक्त काम विश्वासार्हतेने पार पाडण्यासाठी कामाची गुणवत्ता व दर्जा राखून काम विहित मुदतीत पुर्ण करण्याचे जबाबदारीपोटी अनामत रक्कम म्हणून (सिक्युरिटी डिपॉझिट) जाहिरातीत दर्शविलेल्या निविदा रक्कम रु. ५,००,०००/- च्या ५ टक्के रक्कम रुपये २५,०००/- महामंडळाच्या नावे असणारी मुदत ठेवची पावती खात्यास सादर करावी. सदर मुदत ठेव वेळेत सादर न केल्यास उर्वरित अनामत रक्कम रुपये २५,०००/- आपले बिलामधून वसूल करण्यांत येईल. तसेच १ टक्के बयाणा रक्कम रु. ७,५००/- ऑनलाईन पावती क्र. CPACQSZBS5 दि. १२/०४/२०२३ परिवहन महामंडळाकडील टेंडर सेल विभागाकडे जमा केलेली आहे. तसेच सदरकामी टेडर फॉर्म अटी शर्ती मधील अ.क्र.२ नुसार १५ टक्के पेक्षा जास्त कमीने दर दिल्याने रेट ॲनालिसिस व अतिरिक्त रक्कमेची बँक गॅरंटी म्हणून अतिरिक्त अनामत र.रू.१,३५,०००/- पावती क्र.७२१२१ दि.२६/०४/२०२३ रोजी पेटीकॅश विभागात चेकद्वारे भरलेले आहेत.

२. निविदेसोबत जोडलेली सविस्तर निविदा सुचना पुरवणी निविदा सुचना निविदा फॉर्म प्राईस व्हेरीएशन क्लॉज शेड्युल ब व विशेष अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या सयंत्राच्या विशिष्ट तपशील, जनरल स्पेसिफिकेशन व विशेष अटी ठेकेदारचे हमीपत्र व डिक्लेरेशन, वर्कऑर्डर, कामाचे ड्रॉईंग्ज इ. या करारनाम्याचे अविभाज्य भाग आहेत. (पार्ट ऑफ धिस ॲग्रीमेंट) या भागात नमूद केल्याप्रमाणे सर्व अटी व शर्तीचे अधिन राहून तरोच महामंडळाच्या मा. सहव्यवस्थापकीय संचालक व मा. सहाय्यक विद्युत अभियंता यांनी ठरवून दिलेल्या पध्दती व स्पेसिफिकेशनप्रमाणे कामाचे वाढीव अथवा कमी केलेले परिमाण, दुरूस्ती अथवा बदल केलेले नकाशे व परिमाण यानुसार संपूर्ण काम

Scanned with CamScanner

ठेकेदार यांना कामाची वर्कऑर्डर दिल्याचे तारखेपासून बदल केलेले नकाशे व परिमाण यानुसार संपूर्ण काम ठेकेदार यांनी कामाची वर्कऑर्डर दिल्याचे तारखेपासून १ वर्ष (३६५ दिवस) मुदतीत म्हणजेच दि.०८/०५/२०२४ पर्यंत समाधानकारक पुर्ण करणेचे मान्य व स्विकृत केलेले आहे

३. ठेकेदार व पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांच्यातील या करारान्वये व निविदेतील अटी व शर्तीनुसार ठेकेदार यांनी केलेल्या कामापोटी वेळोवेळी द्यावयाची बिले काम गुणवत्तेनुसार व समाधानकारक झालेनंतर महामंडळाने त्वरेने अदा करावयाचे ठरले आहे.

४. विनिर्देशित काम पुर्ण झालेल्या दिनांकापासून १२ कॅलेंडर महिन्यापर्यन्तचा कालावधी डिफेक्ट लायबिलीटी पिरियड म्हणून धरला जाईल. या १२ महिन्यांच्या कालावधीत ठेकेदारने केलेल्या कामात दोष अथवा उणिवा आढळून आल्यास ठेकेदारने त्या स्वखर्चाने निविदा, अटी व शर्तीप्रमाणे दुरुस्त करुन या कालावधीत सदर निविदेतील काम सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील असे ठेकेदार यांनी मान्य, कबूल व स्विकृत केलेले आहे. ठेकेदारास महामंडळ अशा दुरुस्त्या अथवा बदलापोटी कोणतीही रक्कम अदा करणार नाही. ठेकेदाराकडून या जबाबदारीपोटी अनामत म्हणून निविदा रक्कमेच्या ५ टक्के रक्कम रुपये २५,०००/- अनामत रक्कम म्हणून कापून घेण्यात येईल व काम पूर्ण झालेपासून १२ कॅलेंडर महिने परिवहन महामंडळाकडे निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे राखून ठेवण्यात येईल. देखभाल हमी कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कम परत करण्यात येईल. दिलेल्या मुदतीमध्ये काम पुर्ण न केल्यास प्रतिदिन रक्कम रू. १००/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५. ठेकेदारने निविदेतील कामाचा विमा उतरविणे आवश्यक असून, तो विमा सदरील ठेकेदाराने ६० दिवसाचे आत रिसीट सादर करावी तसेच विमा कालावधीमध्ये विमा कंपनीकडे नुकसान भरपाई क्लेम करण्याची जबाबदारी ठेकेदार यांचेवर राहिल. डिफेक्ट लायबिलिटी पिरियड अस्तित्वात राहील व त्याबाबतचा पुरावा म्हणून प्रिमियम रिसीटी सादर केल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करणार नाही. असे ठेकेदार यांनी मान्य कबूल व स्विकृत केलेले आहे.

६. सदर करारनाम्यातील अटी शर्तीस अनुसरून कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास कोणताही वाद हा मे. जिल्हा न्यायालय, पुणे यांचे कार्यक्षेत्रामध्ये राहील.

Nirmitee Enterprises.
Proprietor.

ठेकेदाराची स्वाक्षरी

**सहव्यवस्थापकीय संचालक**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

**साक्षः**

१)

**सहाय्यक विद्युत अभियंता**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

किरण गायकवाड (स्वाक्षरी)
स्वप्निल मोरे

Scanned with CamScanner